प्रेसनोट दिनांक – ०३/०१/२०१७

## घरफोडी व जबरी चोरी करणारे सराईत जेरबंद अडीच लाखाचा ऐवज जप्त सात गुन्हे उघड

दिनांक – १७/१२/१२/२०१६ श्री महेंद्र यशवंत मुदलीयार रा. ४४९/१२, अशेक नगर, पुरग्रस्तचाळ, काशीवाडी, भवानी पेठ, पुणे शहर यांचे घरी धार्मिक कार्यक्रम होता त्या करीता बरेच नातेवाईक आले होत. धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर घरातील सर्वजण झोपले असताना पहाटे रात्रौ ०२/३० ते ०३/०० वा चे दरम्यान अज्ञात चोरटयाने त्यांचे रहाते घरातुन सोन्याचे गंठण, सोन्याचे नेकलेस, कानातील वेल, मंगळसुत्राचे मणी, चांदीच्या पटटया, रोख रक्कम , एक एक्सिप्रीया, ओप्पो, एच टी सी, लावा, नोकीया, मायक्रोमॅक्स कंपनीचा असे मोबाईल हॅन्डसेट दोन मनगटी घडयाळे असा एकुण १,१६,०००/- रुपयेचा ऐवज चोरीस गेलेला होता त्याबाबत त्यांनी खउक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे. अशा प्रकारे कासेवाडी, भवानी पेठ, टिंबर मार्केट या परिसरात घरफोडी चो-या झाल्या असल्याने व गुन्हयाची पध्दत एकसारखीच असल्याने खडक पोलीस स्टेशन पुणे चे पोलीस गुन्हयाचा तपास करुन संशयीत आरोपींचा शोध घेत होते.

सदर बाबत तपास करीत असताना पोलीस हवालदार सर्फराज शेख, विशाल शिंदे व इम्रान नदाफ यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीवरुन पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार तौसिफ बशिर शेख रा - १९ वर्षे रा - मनपा कॉलनी नंबर १० समोर, म्हसोबा मंदिराचे जवळ, काशीवाडी, भवानी पेठ, पुणे यास दिनांक – २५/१२/२०१६ रोजी व दिनांक – २९/१२/२०१६ रोजी संशयीत आकाश उर्फ झुरळया विठठल पाटोळे वय २२, रा कॅन्टोनमेन्ट गुरुव्दारा शेजारी कॅम्प पुणे , विनायक बंडु क-हाळे वय २०, रा चमनशहा दर्गा समोर कासेवाडी भवानी पेठ पुणे व आकाश उर्फ चांग्या अनिल पवार वय १९, रा - म्हसोबा मंदिराचे शेजारी कासेवाडी भवानी पेठ पुणे यांना टिंबरमार्केट परिसरात सापळा रचुन पकडले आहे .पकडण्यात आलेले सर्व आरोपी हे पोलीस अभिलेखावरील सराईत व अटटल गुन्हेगार आहे त्यांचेकडे पोलीसांनी सखोल तपास केला असता त्यांनी कासेवाडी, टिंबरमार्केट, साफीका लेन ,नेहरु रोड या परिसरात घरफोडी व जबरी चोरीचे सात गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे. त्यांचेकडुन वेगवेगळया गुन्हयातील चाळीस ग्रॅम वजनाचे सोन्याचे व ऐंशी ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने व एकुण तेवीस मोबाईल फोन असा एकुण अडीच लाख रुपयाचा ऐवज हस्तगत करण्यात आलेले आहे संशयीत आरोपी आकाश पाटोळे हा त्याची आई श्रीमती आशा विठठल पाटोळे वय – ४८ रा - कासेवाडी भवानी पेठ पुणे हिचेकडे गुन्हयातील चोरलेला माल देत असल्याचे व ती गुन्हयातील चोरलेल्या मालाची विल्हेवाट लावत असल्याचे उघडकीस आलेले आहे म्हणुन तिला गुन्हयामध्ये दिनांक – ०३/०१/२०१७ रोजी दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे मा श्रीमती अे. अेस. बारुळकर प्रथम वर्ग न्यायदंडधिकारी न्यायालय क्रंमाक ६ पुणे यांचे न्यायालयात तिस हजर केले असता दिनांक – ०५/०१/२०१७ रोजी पर्यत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. आरोपी आकाश ऊर्फ झुरळया पाटोळे याचेविरुध्द यापुर्वी घरफोडी चोरीचे आठ , तौसिफ शेख याचेविरुध्द घरफोडी व वाहन चोरीचे पाच गुन्हे विनायक कराळे याचेविरुध्द घरफोडी चोरीचे तीन दंगामारामारीचे एक घातक शस्त्र जवळ बाळगण्याचे दोन असे एकुण सहा गुन्हे दाखल आहेत.

मा. सुधीर हिरेमठ पोलीस उप आयुक्त परिमंडळ – १ पुणे शहर, मा. प्रविण कुलकर्णी सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शना खाली श्री रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पो स्टे पुणे व तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस उप निरीक्षक भरत चापाईतकर अनंता व्यवहारे व तपास पथकातील पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेंद्र पवार, अजय थोरात,विजय कांबळे, बशीर सैयद, संतोष मते, एकनाथ कंधारे, राजन शिंदे, अनिकेत बाबर, विशाल शिंदे, इम्रान नदाफ, संदिप कांबळे, रणजित घडशी, महेश बारावरकर, महेश कांबळे, संदीप कांबळे , राकेश क्षीरसागर, रवि लोखंडे, विनोद जाधव, मिलींद धोत्रे यांनी सदर कारवाई केली आहे.

